30 mtr height for permission Hospital.

**रुग्णालयीन इमारतींची उंची ३० मीटर पेक्षा अधिक वाढविण्यास देण्यात आलेल्या मंजूरीमुळे मिळालेल्या रक्कमेचा विनियोग करण्याबाबत.**

63
2015
Schm

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग,**
**शासन निर्णय क्र. अशसे-२०१४/प्र.क्र.१७१/नवि-२०**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक- १२ मे, २०१५**

**वाचा:-** १) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६
२) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना (सुधारणा )अधिनियम, २०१५

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ च्या कलम ३ व त्याखालील अनुसूची १ व २ नुसार रुग्णालयीन इमारतींची उंचीची कमाल मर्यादा राष्ट्रीय इमारत संहिता, २००५ मधील तरतुदीनुसार ३० मीटर इतकी होती. सदर बंधनामुळे शासन, महानगरपालिका तसेच खाजगी रुग्णालयांच्या विकास, पुनर्विकासास बाधा येत होती. तसेच रुग्णांच्या सेवेसाठीच्या मागणीच्या तुलनेमध्ये रुग्णसेवेच्या सोयी-सुविधा अत्यंत अपुऱ्या पडत असल्याचे निदर्शनास आले होते. त्यामुळे रुग्णालयीन इमारतींच्या कमाल उंचीबाबतची बंधने काढून टाकण्याबाबत सदर अधिनियमात सन-२०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १२ महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना (सुधारणा) अधिनियम, २०१५ अन्वये दुरुस्ती करण्यात आली आहे. या दुरूस्तीच्या अनुषंगाने संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था व विशेष नियोजन प्राधिकरणांना प्राप्त होणाऱ्या उत्पन्नाचा विनियोग त्या त्या क्षेत्रातील अग्निशमन सुविधा वृध्दींगत करण्यासाठी बंधनकारक करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना (सुधारणा) अधिनियम, २०१५ च्या अनुसूची- एक मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या आग प्रतिबंधक यंत्रणा बसविण्याच्या किमान आवश्यकतांची पुर्तता करीत असतील तर ४५ मीटर्स इतक्या उंचीपर्यंतच्या रुग्णालयीन इमारतींना मंजुरी देण्याचे अधिकार संबंधित नियोजन प्राधिकरणास राहतील.

२. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना (सुधारणा) अधिनियम, २०१५ च्या अनुसूची- एक मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या आग प्रतिबंधक यंत्रणा बसविण्याच्या किमान आवश्यकतांची पुर्तता करीत असतील तर ४५ मीटर पेक्षा अधिक उंचीच्या रुग्णालयीन इमारतींच्या अशा प्रस्तावास मंजुरी देण्याचे अधिकार राज्य शासनास राहतील. .